VMT / Sunil

RNI No. MAHMAR/2008/24513
Registration No. MCE/154/2015-2017
Wpp license No. MR/Tech/wpp-306/East/2016
License to post without prepayment

# वार्ता प्रसार

★ वर्ष – ८ ★ फाल्गुन १९३७ ★ युगाब्द ५११७ ★ १ एप्रिल २०१६ ★ पाने – ४ ★ किंमत – २ रु.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा समारोप



**मुंबई :** राजस्थानातील नागोर येथे दि. ११ ते १३ मार्चला आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा उत्साहवर्धक वातावरणात समारोप झाला. देशभरातील संघकार्यात वाढ होत असून, गेल्या वर्षभरात ५५२४ नव्या शाखा सुरू झाल्या असल्याचे वृत्त या बैठकीत जाहीर करण्यात आले. या बैठकीस संघाचे अखिल भारतीय, क्षेत्रीय व विविध प्रांतातील पदाधिकारी तसेच संघविचाराने समाजाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या संघटनांचे प्रतिनिधी असे सुमारे १०५८ कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीचे संक्षिप्त वृत्त पुढीलप्रमाणे :

– राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही भरीव वाढ झाली आहे. २०१२ साली देशभरात संघाच्या ४०९२२ शाखा होत्या. पुढे त्यात वृद्धी होऊन २०१५ साली ५१३३५ शाखा सुरू होत्या. या वर्षभरात ५५२४ शाखा ९२५ साप्ताहिक मिलनांची वाढ झाली असून देशभरात सध्या ५६९५९ शाखा लागत आहेत. देशातील ८४० जिल्ह्यांपैकी ८२० जिल्हे आणि जवळपास ९० टक्के विभागांत संघाचे कार्य पोहोचले आहे.

– मुंबईत देखील २५० शाखा आहेत. ज्यातील ११६ विद्यार्थी शाखा तर १३४ व्यवसायी शाखा आहेत. तर मुंबई व्यतिरिक्त अन्य कोकण प्रांतात २४४ विद्यार्थी व १३१ व्यवसायी अशा ३७५ शाखा लागतात. साप्ताहिक मिलने मुंबईत १६२ तर प्रांतात अन्यत्र २३१ सुरू आहेत. तर मासिक मिलने मुंबईत ७ आणि प्रांतात अन्यत्र १७ आहेत.

– गेल्या वर्षभरात देशभर ८३ संघशिक्षा वर्गांचे आयोजन झाले. ज्यातील प्राथमिक (८ दिवस) वर्गात सुमारे १ लाख १२ हजार स्वयंसेवकांनी प्रशिक्षण घेतले. तर प्रथम, द्वितीय आणि तृतीय (२१ ते २५ दिवस) संघशिक्षा वर्गांत २५४०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

– संघाच्या विविध प्रांतांत लोकजागरणासाठी जागरण पत्रिका पाक्षिक किंवा मासिक स्वरूपात प्रसिद्ध केल्या जातात. या पत्रिका गावे व शहरांतील वस्त्या या ठिकाणी वितरीत होतात. सध्याच्या वृत्तानुसार देशातील **(पान २ वर...)**



## बकऱ्या विकून घरात बांधले शौचालय

पंतप्रधान नरेंद्र मोदी मध्यंतरी छत्तीसगडच्या दौऱ्यावर असताना धामत्री जिल्ह्यातील १०४ वर्षीय वृद्ध महिलेने बकऱ्या विकून घरात शौचालय बांधल्याची माहिती त्यांना मिळाली. स्वच्छ भारत, मजबूत भारत संकल्पना राबवणाऱ्या पंतप्रधानांच्या मनात या वृद्ध महिलेची भेट घेण्याची इच्छा जागृत झाली आणि प्रत्यक्षात भेट घेतल्यानंतर पंतप्रधान चक्क तिच्या पाया पडले.

कुंवरबाई असे वृद्ध महिलेचे नाव आहे. या वयातही भारत निर्माण कार्यात त्यांनी दिलेल्या योगदानामुळे पंतप्रधान



पंतप्रधानांनी धरले १०४ वर्षीय कुंवरबाईचे पाय!

अक्षरशः भारावून गेले. व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून पंतप्रधानांनी तिची भेट घेतली आणि तिचे अभिनंदन करून तिच्या पाया पडले. कुंवरबाईचे हे कार्य म्हणजे भारत बदलत असल्याचेच संकेत आहेत, असे उद्गार पंतप्रधानांनी काढले. इतकेच नव्हे, तर राजनांदगाव येथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी तिचा सन्मानही केला.

या वयात सामान्य नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे काम कुंवरबाईंनी केले. ते कौतुकास्पद आहे. त्यांच्या या कार्यानंतर जिल्ह्यातील ३५५ पैकी ११८ पंचायतींमध्ये शौचालयांची (पान २ वर...)

वार्ता प्रसारमधील वृत्त आपण आपल्या दैनिकात–नियतकालिकात प्रकाशित करू शकता. तो अंक विश्व संवाद केंद्रात अवश्य पाठवावा.

प्रकाशक,मुद्रक श्री. मोहन ढवळीकर, संपादक श्री. दत्तात्रेय दिनकर गोखले यांनी विश्व संवाद केंद्राकरिता हे पाक्षिक अनंत प्रिंटर्स, ए-७८, मेघवाडी, डॉ. एस. एस. राव रोड, लालबाग, मुंबई – ४०० ०१२ येथे छापून विश्व संवाद केंद्र, २१९, सीता निवास, दुसरा मजला, डॉ. आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई – ४०० ०१२, दूरभाष – २४१० ०४३८/२४१० ५४१२, ई-मेल- vsamvad@gmail.com येथे प्रसिद्ध केले.

# भवरलालजी जैन

## ठिबक युगाचा शालिवाहन

**– एस. पी. कुळकर्णी, जळगाव**



पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन यांचे ७८ व्या वर्षी २५ फेब्रुवारी रोजी निधन झाल्यानंतर शेतकी जगत गलबलून गेले. भवरलालजींनी शून्यातून विश्व निर्माण केले. एकेकाळी जिल्हाधिकाऱ्याची मानाची सत्तेची नोकरी झुगारून ज्यांनी सायकलवरून रॉकेल विक्रीचा व्यवसाय सुरू केला, जे बघता बघता करोडपती–अब्जोपती झाले ते भवरलालजी जैन खऱ्या अर्थाने भूमिपुत्र होते. कृषीक्षेत्रातल्या मान्यवरांच्या व हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत शाही इतमामात त्यांना २७ फेब्रुवारी रोजी अखेरचा निरोप देण्यात आला.

दुसऱ्या हरितक्रांतीचे जनक, ठिबक युगाचा शालिवाहन, ऋषी–कृषी संस्कृतीत रमलेले थोर विचारवंत असे त्यांचे वर्णन केले जाते. देशाला पाणी नियोजनाची दिशा देणारे भवरलालजी आधुनिक शेती –ठिबक, ड्रीप, स्प्रींकलर इ.कडे शेतकऱ्यांना वळवणारे भवरलालजी जैन गेल्याने देशाच्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले, हे उद्‌गार आहेत शेतकऱ्यांचा जाणता राजा–माजी कृषीमंत्री शरदराव पवारांचे! तर जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे म्हणतात, भवरलालजींनी जलक्रांती किंवा दुसऱ्या हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख यांनी जैनसृष्टीची पाहणी केल्यानंतर हे खरे कृषी विद्यापीठ अशी दिलेली उपमा सार्थ आहे.

जैन यांचे शेतीसाठीचे प्रयोग –पाणी बचतीचे –उत्पादन वाढीचे प्रयोग देशभरात–जगभरात गाजले. माजी केंद्रीय कृषीमंत्री व उपपंतप्रधान देविलाल, शरद पवार, अण्णासाहेब शिंदे, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, माजी उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत, माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग, शेतकरी नेता व माजी लोकसभा सभापती बलराम जाखड, बाळासाहेब ठाकरे, मनोहर जोशी, गोपीनाथ मुंडे, माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांनी जैन हिल्सवर येऊन कृषीसाठी सुरू असलेले जैन यांचे प्रयोग–परिश्रम आणि दूरदृष्टीची प्रशंसा केली होती.

देशाच्या कानाकोपऱ्यातून केळी उत्पादक, ऊस उत्पादक, कांदा उत्पादक, फळ उत्पादक शेतकरी जैन हिल्स व जैन इरिगेशनला भेट देत असतात. जगभरातल्या नामवंत जलतज्ज्ञांची महत्त्वपूर्ण बैठक भवरलालजींनी भरवली होती. त्यातले विचारमंथन पाणी समस्येवरची उत्तरे शोधायला उपयुक्त ठरले.

विहिरीचे पाणी मोटेतून व पुढे चाऱ्यातून किंवा बाऱ्यांमधून शेताच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहोचवताना अर्धे अधिक पाणी शेतात जिरून जात असे. पी.व्ही.सी. पाईपद्वारे पाणी बचतीचा प्रयोग यशस्वी होतो हा प्रचार जैन समूहाने केला. जैन–पाईप गावागावात पोहोचले. ठिबक तंत्र इस्रायलमधून आणून जैन ठिबकची निर्मिती–प्रचार हा कृषीक्षेत्रातल्या नव्या युगाचा प्रारंभ भवरलालजींनी केला. त्यांना जळगाव रत्न हा पुरस्कार दिला गेला तेव्हा विद्यमान कृषीमंत्री एकनाथराव खडसे म्हणाले होते, भाऊ, तुम्ही आणलेल्या ठिबक क्रांतीमुळे देशभरातल्या माझ्यासारख्या करोडो शेतकऱ्यांचा प्रत्येकी लाखो रुपयांचा फायदा झाला आहे.

**ठिबक तंत्रज्ञान यशस्वी**

संशोधन, वापर, प्रचाराचे श्रेय भवरलालजींनाच जाते. केळी आणि कांदा ठिबकवर घेता येतो हे त्यांनी लाखो शेतकऱ्यांना जैन हिल्सच्या प्रयोगशाळेत आणून दाखवून दिले. ठिकठिकाणच्या कृषी प्रदर्शनातून, मेळाव्यातून, भाषणातून पटवून दिले. कल्पक जाहिरातीतून मोठा प्रचार केला.

**पाणी निम्म्यानं... उत्पादन दुपटीनं**
***ही कल्पना रुजवली***

'पाणी हाफ उत्पादन डबल...जैन ठिबकशिवाय कुणाला जमलं?' ही जैन समूहाची मोबाईल रिंगटोन त्यांचा आत्मविश्वास दर्शवते. या भगीरथ प्रयत्नांमुळे जागतिक कीर्तीचा जेम्स हार्डी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव झाला. आतापर्यंत जागतिक स्तरावरचे २०० पुरस्कार कंपनीला मिळाले.

भवरलालजींचे मोठेपण कशात? हा प्रश्न विचारून केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, ते मोठे उद्योगपती, करोडपती आहेत, त्यांना चार–चार विद्यापीठांनी डॉक्टरेट पदवी दिली, ते पद्मश्री आहेत, यात त्यांचे मोठेपण नाही. लक्ष्मी आणि सरस्वती प्रसन्न असूनही त्यांना शेठ, साहेब म्हणत नाहीत. ते सगळ्यांचे भाऊ आहेत. हे त्यांचे मोठेपण आहे. शेती–मातीत रमणारे भवरलालजी शेतकऱ्यांसाठी मोठे भाऊच होते.

ते निसर्गवेडे होते तसेच वाचनवेडे होते. चांगली पुस्तके कुठूनही मिळवत असत. आवडलेली पुस्तके मित्रमंडळींना–पाहुण्यांना भेट देत. सर्वांना भेटी दिल्यानंतरही त्यांची स्वतःची दहा हजार पुस्तकांची लायब्ररी आहे. वाचताना टिपणे काढण्याचा त्यांचा छंद होता. चांगल्या पुस्तकांचा वास त्यांना बरोबर येई. मी लायब्ररी आणि लॅबोरेटरी या दोन गोष्टींमध्ये रमतो. शेती, विचारांची प्रगल्भता, कुशाग्र बुद्धी आणि अफाट स्मरणशक्ती यामुळे त्यांचे भाषण भारदस्त वाटे. पण बोजड व बोअरिंग नव्हे. ते नेहमी नर्मविनोदी, खुसखुशीत आणि प्रसन्न असे. थोर विचारवंत असा त्यांचा गौरव सर्वत्र होऊ लागला.

भारतात ११ आणि परदेशात १३ असे २४ उद्योग आणि त्यातून १०००० सहकाऱ्यांच्या (ते कर्मचाऱ्यांना सहकारी म्हणत) कुटुंबाचे पोशिंदे होते. त्यांनी विद्येला विनयाची जोड दिली. त्यांनी साधनेला सातत्याची जोड दिली. सामर्थ्याला संयमाची जोड दिली आणि कर्तृत्वाला दातृत्वाची जोड दिली. पाण्याचे आणि वेळेचे नियोजन कसे करावे, याचा ते आदर्श होते. नवोदित व्यावसायिक, उद्योगपतींना त्यांचे जीवन व कार्यशैली प्रेरक आहे.

महाराष्ट्राचे माजी कृषी राज्यमंत्री गुलाबराव देवकर म्हणतात, भवरलालजींनी ठिबक क्रांती आणली नसती, तिचा प्रचार आणि प्रसार केला नसता तर आजच्यापेक्षा भीषण पाणीटंचाई जाणवली असती. संपूर्ण देशात आणि जगभरात पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढले असते. पण भाऊंनी ठिबक क्रांती घडवली हे त्यांचे मोठे उपकार झालेत. माजी आमदार कृषीभूषण साहेबराव पाटील यांनी आपल्या शेती प्रगतीचे श्रेय भवरलालजींना दिले. ते म्हणाले, प्रारंभी ज्यांनी ठिबक संच बसवले त्या तिघांपैकी मी एक आहे. (कविवर्य ना. धों. महानोर, धर्मराज पाटील व मी) तेथूनच माझी प्रगती

झाली. उत्पन्न ४-५ पटींनी वाढले आणि मला कृषीभूषण पुरस्कार मिळाला.

केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी जैन उद्योग समूहाच्या कार्याची -शेतकऱ्यांच्या बांधिलकीची स्तुती केली. देशभरातल्या उद्योजकांपुढे भवरलालजी एक आदर्श आहेत. त्यांना चार कर्तृत्ववान मुलांची साथ आहे. तेही वडिलांप्रमाणेच ध्येयनिष्ठेने, चिकाटीने कार्य करत आहेत. हे देदीप्यमान यश सतत कायम राहील असा विश्वास वाटतो. केंद्रीय मंत्री मनेका गांधींनीही ओसाड टेकड्यांचे रूपांतर हिरव्यागार टेकड्यांत झाल्याचे पाहून आनंद व्यक्त केला होता.

भवरलालजी उद्योगपती झाले नसते तर ते मोठे साहित्यिक झाले असते. 'आजची समाज रचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी' हे विचारांना चालना देणारे पुस्तक त्यांच्या विचारांची प्रगल्भता आणि उंची दर्शवते. कहाणी. कष्टलाटांच्या पाणलोटांची, A Telling Tale हे बंध रेशमांचे, Uniting Bond, Then and Now इ. पुस्तके आणि लेख -भाषणांमुळे उद्योगपतींना सहसा न लागणारे विशेषण, थोर विचारवंत हे त्यांच्या नावामागे जोडले जाऊ लागले.

आपल्या यशाचे श्रेय आई गौराबाईंना ते देतात. नोकरी न करता व्यवसाय कर, तुझ्यामुळे अनेकांचा संसार चालला पाहिजे. त्यांची पोटे भरतील असा आधारवड हो. त्याचबरोबर पशु-पक्षी, कीडा-मुंगी यांच्याही दाणापाण्याची व्यवस्था कर. हा सल्ला मानून त्यांनी अवघ्या ७००० च्या भांडवलावर रॉकेल विक्रीचा व्यवसाय सुरू केला. आईबरोबरच पत्नी कांताबाईने दिलेली साथ मोलाची असल्याचे ते प्रांजळपणे मान्य करतात. ती आणि मी ही त्यांच्या संवेदनशील संबंधांवरची आत्मकहाणी आहे. आपल्या यशाचे श्रेय ते ती ला देतात. हा नारीशक्तीचा गौरव अनेक वेळा त्यांनी केला. त्यांच्या निधनानंतर एका जाहिरातीत त्यांचे उद्‌गार दाखवले होते. सोन्यासारख्या सुना आणि चांदीसारखी मुले असताना मला काय कमी आहे? या वाक्यात ते मुलांना हिऱ्याची उपमा देऊ शकले असते (ते खरे ही आहे.) परंतु त्यांनी सदैव मातृशक्ती-नारीशक्तीला महत्त्व दिले हे स्पष्ट होते.

त्यांचे आरोग्य - व्यवस्थापन सर्व उद्योगपती, बडे राजकारणी, मोठा व्यापार उदीमाचा ताणतणाव सांभाळणाऱ्यांना प्रेरणादायी आहे. आपल्या शरीराची, असणाऱ्या रोगांची, त्यावरील औषधांची, पथ्याची, व्यायाम-प्राणायाम-ध्यान इ. ची एवढी माहिती असणारा पेशंट आम्ही पाहिला नाही. हे अनेक नामांकित डॉक्टर्स सांगतात. दररोज ५ किमी सकाळचा मॉर्निंग वॉक चुकता कामा नये, असा त्यांचा आदेश होता. आयुष्यभर तर तो नियम त्यांनी पाळलाच. पण अंत्यसंस्काराच्या दिवशी त्यांचे कलेवर असलेली शवपेटी त्याच रोजच्या मार्गाने त्यांच्या मुलांनी नेली. मृत्यूनंतरचा अखेरचा मॉर्निंग वॉक ही कल्पनाच अंगावर शहारे आणते. अशी श्रद्धांजली दुर्मिळच.

काय खावे, काय खाऊ नये याबद्दल ते काटेकोर होते. चहा-कॉफी कधीच घेत नसत. त्यांच्या सर्व कारखान्यांमध्ये चहा-कॉफी-बिडी-सिगारेट, तंबाखू, गुटखा, मावा इत्यादींना सक्त बंदी आहे. स्वतः शाकाहारी व पूर्ण निर्व्यसनी होते. ताजी फळे, अक्रोड, बदाम, पिस्ते (तीही मोजकीच) नाश्त्यात घेत असत. ५ मोठे हार्टअ‍ॅटॅक, ८ सौम्य अ‍ॅटॅक, अँजिओप्लास्टी वगैरे होऊनसुद्धा ७८ व्या वर्षी ते १२ ते १४ तास सक्रिय होते. जसलोकमधून परतल्यानंतरही शेवटच्या ८ दिवसांत त्यांनी २ मिटिंग्ज घेतल्या होत्या.

गांधी विचारांचे पाईक असल्याने साधी राहणी अंगात भिनलेलीच होती. आईवडिलांच्या संस्कारामुळे ते भारतीय संस्कृतीचा वाहक बनले होते. विज्ञानाला अध्यात्माची जोड दिल्याशिवाय अंधश्रद्धा चळवळ यशस्वी होणार नाही, असे डॉ. नरेंद्र दाभोळकरांना त्यांच्या व्यासपीठावरून त्यांच्या तोंडावर ऐकवणारे मोठे भाऊ कदाचित पहिलीच व्यक्ती असतील. संघ परिवार, विशेषतः अभाविप, जनकल्याण आश्रम, विहिंप, संघाच्या सेवाभावी संस्थांना ते सढळ हाताने मदत करत असत. भारतीयत्व, भारतीय संस्कृती, शिस्त, राष्ट्रप्रेम, सदाचार, त्याग, अपार कष्ट आणि समाजावर आईसारखे प्रेम करणारे हे व्यक्तिमत्त्व संघाचेच सदस्य असावे असे वाटत असे. आणीबाणीच्या काळापूर्वी आचार्य विनोबा भावे म्हणाले होते, मी रा. स्व. संघाचा 'असभ्य' सभ्य आहे. (संघाचे सदस्य नसले तरी सभासद आहेत.) भवरलालजींची स्थिती तशीच होती.

ठिबक युगाच्या शालिवाहनास शतशत प्रणाम!

# भारतीय नाही, परंतु भारतीयापेक्षा कमी नाही! वेदांचे शिक्षण देणारे स्टीफन नेप

हिंदू धर्मग्रंथ ज्ञानांनी भरलेले आहेत. या धर्म ग्रंथांमधून वर्णिलेल्या गोष्टी पूर्णपणे वैज्ञानिक आहेत. ते वाचणारे, अभ्यासणारे भले भारतीय असोत किंवा विदेशी ते स्वतःला या ग्रंथांच्या आणि त्यात सांगितलेल्या ज्ञानाच्या जवळचे मानतात. ते त्यांचे वाचन करून केवळ रोमांचित होत नाहीत तर ते भारतीय संस्कृतीकडे खेचले जातात. अमेरिकेतील स्टीफन नेप तथा श्री नंदनानंदन दास यांच्याबाबतीत असेच घडले आहे. स्टीफन नेप यांनी भगवद्‌गीता वाचली आणि त्यांचे जीवनच बदलून गेले.

श्री स्टीफन नेप वैदिक फ्रेंड्स अ‍ॅसोसिएशन (डेट्रॉइट, मिशिगन, अमेरिका) चे अध्यक्ष आहेत. त्यांचा जन्म ख्रिश्चन परिवारात झाला. त्यांनी बायबलचे बरेच अध्ययन केले, परंतु त्यांचे समाधान झाले नाही. तरुणावस्थेत मनात जे प्रश्न उठत होते, त्याचे बायबलमध्ये उत्तर मिळू शकले नाही. त्यांनी प्रश्नांच्या उत्तरासाठी अन्य रिलिजन व दर्शन यांचे अध्ययन केले, परंतु निराशाच पदरी पडली.

आपली जिज्ञासा शांत करण्यासाठी स्टीफन नेप जेव्हा इतके तिकडे भटकत होते, तेव्हा त्यांना भगवद्‌गीतेची एक प्रत हाती लागली. त्याच दिवशी त्यांना आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळत गेली. भगवद्‌गीतेच्या ज्ञानाने प्रभावित स्टीफन नेप वैदिक ज्ञानाच्या शोधात गुंतले, ते गत ३० वर्षांपासून वेदांमधून वर्णन केलेल्या वैज्ञानिक तथ्यांचे अध्ययन करीत त्यावर शोधकार्य करीत आहेत. त्यांनी वैदिक संस्कृत आणि दर्शन आणि वैदिक विज्ञान आणि वैदिक अध्ययन विषयावर २५ हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. जो कोणी त्यांनी लिहिलेली ही पुस्तके वाचतो, तो प्रभावित झाल्याविना राहात नाही. स्टीफन नेप जगाला वेदांच्या मार्गावर चालण्याची शिकवण देत आहेत. या सर्वांमुळे त्यांचे परिचित त्यांना पूर्ण भारतीय मानू लागले आहेत. भारतीय संस्कृतीच्या रंगात रंगून गेलेले स्टीफन नेप स्वतःच म्हणतात, होय मी भारतीय नाही, परंतु कधी कधी मी हे विसरून जातो. परंतु प्रत्येक व्यक्ती जी मला ओळखते ती हेदेखील ओळखते की आपल्या गतजन्मात मी भारतीय होतो आणि आजही त्या लक्ष्यासाठी काम करीत आहे.